# पितृपक्ष

सिद्धयोग मार्गावरील एक परंपरा जिचे पालन आपण करतो, ती आहे पितृपक्ष. याचा अर्थ आहे 'पितरांना किंवा पूर्वजांना समर्पित पंधरवडा.' दोन आठवड्यांचा हा कालखंड, भारतीय पंचांगाच्या चांद्र तिथीनुसार आश्विन महिन्यात आणि ग्रेगोरियन कॅलेंडरनुसार सप्टेंबर महिन्यात किंवा ऑक्टोबरच्या आरंभी येतो. या प्रथेचा स्रोत भारताचा सर्वात पुरातन शास्त्रग्रंथ ऋग्वेद यामध्ये आढळतो. पितृपक्षाचे वर्णन शास्त्रग्रंथांतून, विशेषत्वाने पुराणांतून[१] एका अशा शक्तिपूरित काळाच्या रूपात केले गेले आहे की ज्यामध्ये आपण त्या सर्वांच्या प्रति सन्मान आणि आभार व्यक्त करतो, ज्यांनी आपल्याआधी येऊन आपल्याला मार्गक्रमण करता यावे यासाठी मार्ग तयार केले आहेत. ते म्हणजेच आपले दिवंगत नातेवाईक, मित्र, हितचिंतक आणि अगणित आत्मे ज्यांनी आपल्याला जीवनात कृपा, प्रज्ञान, संरक्षण व प्रेम प्रदान केले आहे.

वैदिक परंपरेनुसार 'पितर किंवा पूर्वज' या शब्दाच्या अंतर्गत मातृकुळातील व पितृकुळातील तीन दिवंगत पिढ्या येतात, ते म्हणजे आपले माता-पिता, आजी-आजोबा आणि पणजी-पणजोबा. यामध्ये इतर दिवंगत नातेवाईक जसे की पती किंवा पत्नी, मुले, भावंडे, काकू व काका, आत्या, मामा व मावशी इत्यादी आणि सासू व सासरे यांचादेखील समावेश होतो. पितृपक्षादरम्यान मित्र, शेजारीपाजारी, शिक्षक, मार्गदर्शक आणि इतकेच नाही तर आपले प्रिय पाळीव प्राणी जे हे जग सोडून गेले आहेत, या सर्वांचाही सन्मान करता येतो.

गरुड पुराणानुसार, पितरांचे पूजन केल्यामुळे व्यक्तीला दीर्घायुष्य, संततीसुख, स्वर्ग, यशप्राप्ती, आरोग्य, बल, सौभाग्य, सुखसंपदा आणि धनधान्य यांचा लाभ होतो.[२] विष्णु पुराणात असा उल्लेख आहे की, जी व्यक्ती आपल्या पितरांसाठी श्रद्धेने व भक्तीने श्राद्धकर्म संपन्न करते, ती व्यक्ती संपूर्ण जगाला प्रसन्न करते.[३]

पितृपक्षाचे अनुष्ठान करणे ही निसर्गाच्या सामर्थ्यांशी सामंजस्य स्थापित करण्याची एक रीत आहे. आपण, जे या जगात राहत आहोत आणि ते, जे स्वर्गवासी झाले आहेत, त्याच दिव्य चितिशक्तिचे अंश आहेत जी या चराचर सृष्टीचे मूळ कारण आहे. म्हणून, प्रार्थनांचे आणि सदिच्छांचे हे

आदानप्रदान आपल्या जीवनात तसेच जे या जगात आपल्या आधी राहून गेले आहेत, त्यांच्या जीवनात मांगल्य आणते.

पितृपक्षाचे पालन करून, व्यक्ती तिच्या आध्यात्मिक अभ्यासाची पुण्यफले आशीर्वादांच्या स्वरूपात दिवंगत आत्म्यांना प्रदान करते. त्यांच्यासाठी केल्या गेलेल्या पूजनाने प्रसन्न होऊन, पितृगणही त्या बदल्यात त्यांच्या वंशजांना आणि मित्रमंडळींना आपले आशीर्वाद प्रदान करतात.

## करण्यायोग्य कृत्ये

पितृपक्षादरम्यान ध्यान, नामसंकीर्तन, मंत्रजप आणि प्रार्थना यांसारखे आध्यात्मिक अभ्यास आपल्या पितृगणांना समर्पित करण्याची परंपरा आहे. आपल्या दिवंगत पितरांना आणि मित्रांना आशीर्वाद पाठवण्याचा दुसरा एक सशक्त मार्ग आहे, त्यांच्यासाठी श्रीगुरुगीतेचा पाठ अर्पित करणे.

आपल्या पितृगणांसाठी त्यांच्या वतीने आपण एस. वाय डी. ए. फाउंडेशन सारख्या लाभनिरपेक्ष संस्थांना दक्षिणा अर्पण करू शकतो किंवा एखाद्या धर्मादाय संस्थेला अन्न वा वस्त्र यांचे दान करू शकतो.

## वर्ज्य कृत्ये

या पंधरवड्यादरम्यान, असा सल्ला दिला जातो की, लोकांनी एखादी नवीन योजना किंवा महत्त्वाचे उपक्रम सुरू करू नयेत. दीर्घ पल्ल्याचे प्रवास जसे की आंतरराष्ट्रीय प्रवास करणे टाळावे, परंतु कमी अंतराचा विमानप्रवास किंवा गाडीने प्रवास करता येऊ शकतो. या कालखंडात प्रवास करणे जर तुमच्यासाठी अनिवार्यच असेल, तर तुम्ही विशेषकरून सावधानता आणि सर्तकता बाळगणे तसेच संरक्षणासाठी प्रार्थना अर्पण करणे उचित राहिल. पितृपक्षादरम्यान तीर्थयात्रा किंवा आध्यात्मिक अभ्यास सुरू करण्यासाठी यात्रा करणे शुभ मानले जाते.

कृपया या मार्गदर्शक तत्त्वांचा विचार सूचना या स्वरूपात करा आणि आपल्या परिस्थितीनुसार उचित योजना बनवा.

---

[१]पुराण, भारताच्या संस्कृत भाषेचा ग्रंथ आहे ज्यामध्ये भगवंताच्या लीला आणि जगताची उत्पत्ति, स्थिती व संहार याचे वर्णन आहे.

[२]गरुड पुराण, १०.५.५७-५९: संक्षिप्त गरुड पुराण, गीता प्रेस, गोरखपुर, उत्तर प्रदेश, भारत.

[३]विष्णु पुराण, ३.१४.२: विष्णु पुराण, गीता प्रेस, गोरखपुर, उत्तरप्रदेश, भारत.

© २०१८ एस.वाय.डी.ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.